क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/४२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २३ सप्टेंबर, १९८६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ९ सप्टेंबर, १९८६ रोज़ी झालेल्या ४२व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
२३/९/८६

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No. BMRDA/MTG/42.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East),
BOMBAY- 400 051.

Date : 23rd September, 1986

The minutes of the 42nd meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 9th September, 1986 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

Sgaonkar 23/9/86
( S.V. SGAONKAR )
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE

To :

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

---------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बेचाळीसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ९ सप्टेंबर, १९८६ (मंगळवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता.

सभास्थान : समिती कक्ष, ५वा मजला, मंत्रालय, मुंबई.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रह्मण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री. | -- | सदस्य |
| श्री. दत्ता नलावडे,<br>मुंबईचे महापौर. | -- | सदस्य |
| श्री. रमणलाल छोटालाल अंकलेश्वरिया<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. | -- | सदस्य |
| श्री. भगवंतराव अण्णासाहेब पाटील.<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. | -- | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू<br>विधानसभा सदस्य. | -- | सदस्य |
| श्री. पांडुरंग शिवराम देशमुख<br>विधान परिषद सदस्य. | -- | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग. | -- | सदस्य |
| श्री. दिनेश अफझुलपूरकर<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग. | -- | सदस्य |
| श्री. ल. चं. गुप्ता<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, मुंबई | -- | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर<br>महानगर आयुक्त. | -- | सदस्य-सचिव |

बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या मागील (१) एकेचाळीसाव्या आणि (२) विशेष बैठकीची कार्यवृत्ते पक्की करणे

वरील बैठकांची कार्यवृत्ते पक्की करण्यात आली.

...२/-

बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या मागील (१) एकेचाळीसाव्या आणि (२) विशेष बैठकीच्या कार्यवृत्तांवर केलेली कार्यवाही

या बाबीवर झालेल्या चर्चेच्या वेळी अध्यक्ष महोदयांनी, डोंबिवली व सभोवतालच्या भागातील रहिवाश्यांच्या सोयीसाठी दिवा-वसई रेल्वे मार्गावर एक रेल्वेस्थानक सुरु करण्यासाठी योग्य ती उपाययोजना यथावकाश केली जावी या अनुरोधाने रेल्वेमंत्र्यांना तशी विनंती करणारे एक पत्र आपल्या स्वाक्षरीने अग्रेषित करण्यात यावे, अशी सूचना केली. त्यानंतर प्राधिकरणाने कार्यवाही-अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र.३ : लोखंड व पोलादाच्या घाऊक बाजारपेठेचे कळंबोली येथे स्थलांतर

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१६ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नवीन मुंबईत कळंबोली येथे लोखंड व पोलादाची घाऊक बाजारपेठ विकसित करण्यात झालेली प्रगती विचारात घेतल्यानंतर हे प्राधिकरण (बीएमआरडीए) मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठ (स्थल विनियमन) अधिनियम, १९८३ (१९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४२) च्या कलम ३ चे उप-कलम (१) अन्वये प्रत्यायोजित शक्तींआधारे मुंबई महानगर प्रदेशाचे पुढील स्थळ, दिनांक १ जानेवारी, १९८७ पासून, वरील मालाचे बाजारपेठ क्षेत्र व बाजारपेठ आवार म्हणून कार्यान्वित रहाणार असल्याची याद्वारे घोषणा करीत आहे.

'बाजारपेठ क्षेत्र :

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे (१९७५चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४) कलम २ चा खंड (ब) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे समग्र मुंबई महानगर प्रदेश.'

'बाजारपेठ आवार :

महाराष्ट्र भू-महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) च्या कलम ४ आणि इतर प्रयोज्य तरतुदीखाली रायगड जिल्ह्यातील (खिडूकपाडा व सुधीरनगर वगळून) कळंबोली, रोडपाली, आंबेतारखार, वालावली व तेंभोडे या महसूल खेड्यांचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) च्या कलम ११३ च्या उप-कलम(१) खाली नवीन मुंबईकरिता निर्देशित स्थळ म्हणून समाविष्ट असलेल्या सर्व भाग व तुकडा ज्या भाग व तुकड्याच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहेत :

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | 'सध्याचा दिवा-पनवेल रेल्वेमार्ग |
| उत्तरेस | : | नवाडे नदी |
| पश्चिमेस | : | राष्ट्रीय महामार्ग क्र.४ |
| दक्षिणेस | : | एफसीआयची कुंपणाची भिंत (उत्तर)' |

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, अधिनियमाच्या संबद्ध तरतुदीखाली आवश्यक असल्याप्रमाणे शासन राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करण्यासाठी महानगर आयुक्ताना याव्दारे प्राधिकृत करण्यात यावे/येत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा (स्थल विनियमन) अधिनियम, १९८३ (१९८३चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४२) च्या तरतुदीखाली बाजारपेठ क्षेत्र बाजारपेठ आवार व बाजारपेठ समितीच्या स्थापनेसाठी आणि कळंबोली बाजारपेठ आवाराव्यतिरिक्त मुंबई महानगर प्रदेशात अन्यत्र कोणत्याही ठिकाणी लोखंड व पोलादाचा घाऊक व्यापारधंदा करण्यास प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक उपाय योजता यावेत. यास्तव महानगर आयुक्ताना याव्दारे प्राधिकृत करण्यात यावे/येत आहे."

प्राधिकरणाच्या सदस्यांची कळंबोली येथील लोखंड व पोलाद बाजारपेठेला भेट आयोजित करण्यात यावी, अशीही बैठकीत सूचना करण्यात आली.

बाब क्र.४ : डोंबिवली व सभोवतालच्या भागासाठी प्रारुप अंतरिम विकास आराखडा : प्राप्त सूचना व हरकतींवर विचारविमर्श करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ खाली नियोजन समितीची नियुक्ती.

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, डोंबिवली व सभोवतालच्या भागासाठीचा प्रारुप अंतरिम विकास आराखडा प्रकाशित झाल्यानंतर, त्याला अनुलक्षून जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचारविमर्श करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २८(२) खाली पुढील तीन सदस्यांचा समावेश असलेली एक नियोजन समिती नियुक्त करण्याचा प्राधिकरण याव्दारे निर्णय घेत आहे. नियोजन समितीवर सदस्य पुढीलप्रमाणे असतील :

१) श्री.पांडुरंग शि.देशमुख,
२) श्री.चंद्रशेखर प्रभू, व
३) महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वरील सदस्यांपैकी कुणीही दोन सदस्य बैठकीस उपस्थित असल्यास ती ग्राह्य गणपूर्ती समजण्यात यावी.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नियोजन समितीने संबंधीत अभिवेदकांची बाजू ऐकून घेऊन उक्त अंतरिम विकास आराखड्यावरील आपल्या शिफारशी संकल्पित फेरफारांसह, तसे ते असल्यास, प्राधिकरणाला विचारविमर्शासाठी सादर कराव्यात."

बाब क्र.५ : मुंबई नगर विकास प्रकल्पाचा १९८५-८६ सालाचा वार्षिक कार्य-अहवाल

वरील बाब-टिप्पणीवर झालेल्या चर्चेच्या वेळी पुढील सूचना करण्यात आल्या व त्यानंतर प्राधिकरणाने मुंबई नगर विकास प्रकल्पाच्या १९८५-८६ सालाच्या कार्य-अहवालाची नोंद घेतली :

(१) अभीकरणांना कर्ज देतेवेळी आकारला जाणारा साडेआठ टक्के हा व्याज दर अधिक वाटतो. सदर व्याज दरात घट होण्यासाठी भारत सरकारला योग्य अभिवेदन सादर केले जावे अशी सूचना करण्यात आली. व

(२) प्रस्तुत प्रकल्पात दाखविण्यात आलेली रु.३/- कोटींची तरतूद झोपडपट्टीतील कचरासंकलन यंत्रणेवर त्याचप्रमाणे समाईक सोयी निर्माण करण्यासाठी खर्च करता येईल असे सांगण्यात आले. मुंबई महानगरपालिकेला या तरतुदींचा लाभ घ्यावयाचा असल्यास महानगरपालिकेने आवश्यक प्रस्ताव सादर करावे अशीही सूचना करण्यात आली.

बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १९८५-८६ सालाचे वार्षिक लेखे

वरील बाब टिप्पणीवर झालेल्या चर्चेच्या वेळी पुढील मुद्दे मांडण्यात आले :-

(१) सदस्यांनी केलेल्या पृच्छेस अनुलक्षून मुख्य अभियंता यांनी १९८५-८६ वर्षात प्राधिकरणाने केलेल्या रु.४५/- लाख खर्चाचा तपशील सादर केला. प्राधिकरणाच्या सदस्यांची माहीम निसर्गोद्यानाला भेट आयोजित करण्यात यावी अशी सूचना सदस्यांनी नंतर केली.

(२) राज्य शासनाने मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १८ (१) (अ) च्या तरतुदींनुसार या प्राधिकरणाला, त्याच्या स्थापनेपासून आजमितीस एकूण किमान रु.५५ कोटींचे अनुदान देणे क्रमप्राप्त होते. प्रत्यक्षात मात्र रु.१२.४७ कोटी इतके अंशदान मिळाले आहे असे मत बैठकीत व्यक्त झाले. त्याचप्रमाणे, प्राधिकरणाच्या रु १० कोटींच्या फिरत्या निधीस शासनाकडून अपेक्षित अंशदानापैकी प्रत्यक्षात फक्त रु.साडेतीन कोटी उपलब्ध झाले. मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियमातील सांविधिक तरतुदींनुसार मिळावयाचे किमान अंशदान उपलब्ध करण्याची शासनाला विनंती करण्यात यावी अशी सूचना सदस्यांनी केली.

त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९८५-८६ सालाच्या लेख्याला व त्यावरील वित्त सल्लागारांच्या अहवालास प्राधिकरण याव्दारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.७ : बॅक-बे रिक्लेमेशन योजनेसाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरणाचा १९८५-८६ सालाचा वार्षिक कार्य-अहवाल

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला व त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३१९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बॅक-बे रिक्लेमेशन क्षेत्राच्या ब्लॉक ३ ते ब्लॉक ८ मधील समाविष्ट असलेल्या भागासाठीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने तयार केलेल्या १९८५-८६ या सालाच्या वार्षिक प्रारुप अहवालाला प्राधिकरण आपली मान्यता देत आहे आणि त्यापुढे असाही ठराव मंजूर करीत आहे की, सदर अहवाल शासनाला सादर **करण्याकरिता** महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे."

बाब क्र.८ : वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राचे विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेला सदर अधिसूचित क्षेत्राचा १९८५-८६ सालाचा वार्षिक कार्य अहवाल...

या बाबीवर झालेल्या चर्चेच्या वेळी पुढील सूचना करण्यात आल्या :-

(१) सदस्यांनी विचारणा केली असता, मुख्य अभियंता यांनी मिठी नदीतील गाळ-उपसासंबंधी माहिती दिली. अंदाजे रु.४४ लाख खर्चाच्या आंशिक कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. लवकरच त्या अंतीम करण्यात येऊन कामाला सुरुवात होईल अशीही माहिती यावेळी देण्यात आली.

(२) उपनगराच्या एकूण जलनि:स्सारणवाहिनी यंत्रणेचे हवाई सर्वेक्षण हाती घेण्यात यावे अशी सूचना करण्यात आली. यासंबंधी जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या १९८६-८७ सालाच्या वार्षिक अंदाजपत्रकात रु.१० लाखांची तरतूद करण्यात आली असल्याचे याप्रसंगी सांगण्यात आले. या सूचनेचे परिक्षण करण्याचे त्यानंतर मान्य करण्यात आले.

(३) सदस्यांच्या पृच्छेस अनुलक्षून असे सांगण्यात आले की, संबंधित स्रोतांतून संकलित करण्यात आलेल्या आधारसामग्रीआधारे जल-व्दाराचे संकल्पचित्र तयार करण्यात आले आहे. खाडीला भरती

असतानाही तासाला अडीच इंच या वेगाने सलग चार तास तीव्र पर्जन्यवृष्टी झाली **तरी** देखील पाण्याचा दाब पेलू शकेल इतकी सदर जलव्दाराची क्षमता आहे.

(४) मिठी नदी आणि वाकोला नाल्यातील गाळ उपसण्याच्या कामास प्राधान्यक्रम दिला जावा आणि त्याप्रित्यर्थ जादा निधी उपलब्ध करुन देण्याची शक्यता पडताळून पहाण्यात यावी अशीही सूचना करण्यात आली.

त्यानंतर खालील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र.३२० :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की</u>,महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे आणि वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर क्षेत्रासाठी तयार केलेला १९८५-८६ सालाचा वार्षिक अहवाल प्राधिकरण याव्दारे मंजूर करीत आहे आणि तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तांना या ठरावान्वये प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.९ :</u> मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा <u>१९८५-८६ सालाचा वार्षिक कार्य-अहवाल</u>

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि १९८५-८६ सालाच्या वार्षिक कार्य अहवालाच्या प्रारुपास आपली मान्यता दिली आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.३२१ :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की</u>,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९८५-८६ सालच्या प्रारुप वार्षिक कार्य अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे व अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>पटल बाब :</u>

अध्यक्ष महोदयांच्या अनुमतीने 'ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी प्रारुप नियोजन प्रस्तावाला अनुलक्षून मागविण्यात आलेल्या हरकती/सूचनांची सुनावणी करण्यासाठी नियोजन समितीची नियु **ही टिप्पणी पटल-बाब** म्हणून विचारात घेण्यात आली.प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३२२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २९ चे उपकलम २ अन्वये प्रदत्त शक्तींचा व त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणाऱ्या इतर सर्व शक्तींचा अवलंब करून हे प्राधिकरण ओशिवरे जिल्हा केंद्राच्या प्रारुप प्रस्तावाना अनुलक्षून प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर प्रचलित अधिनियमातील संबध्द तरतुदींनुसार विचारविमर्श करण्यासाठी त्या. महानगर प्राधिकरणाचे खाली नमूद केलेली सदस्य असलेल्या नियोजन समितीकडे अग्रेषित करण्यास आपली मान्यता देत आहे :-

(१) श्रीमती इंदुमती त्रि.पटेल.
(२) आयुक्त, मुंबई महानगरपालिका, आणि
(३) महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उपरोक्त सदस्यांपैकी कोणत्याही २ सदस्यांची बैठकीतील उपस्थिती ही ग्राह्य गणपूर्ती समजण्यात येईल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नियोजन समितीने संबंधित व्यक्तींची बाजू ऐकून घेऊन ओशिवरा जिल्हा केंद्राच्या प्रारुप नियोजन प्रस्तावांवरील आपल्या शिफारशी-- त्यांना अनुलक्षून कोणतेही फेरफार प्रस्तावित असल्यास त्यांच्यासकट-- प्राधिकरणाच्या विचारविमर्शासाठी सादर कराव्यात."

अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज त्यानंतर समाप्त झाले.

-----

# MINUTES OF THE FORTY-SECOND MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 9th September, 1986 (Tuesday).

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room, 5th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| Dr. | V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri | Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri | Datta Nalawade, Mayor of Bombay. | - Member |
| Shri | R.C. Ankleshwaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri | Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri | Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri | Pandurang S. Deshmukh, M.L.C. | - Member |
| Shri | D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri | D.K. Afzulpurkar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri | L.C. Gupta, Managing Director, C.I.D.C.O., Bombay. | - Member |
| Shri | S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (i) 41st and (ii) Special Meeting.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (41st) and Special Meeting.

During the course of discussion on this item, the Chairman suggested that a letter to the Minister for Railways be sent under his signature for taking necessary steps in due course for opening a railway station on Diva-Vasai line for the convenience of residents of Dombivali and surrounding areas. The action taken

report.....

report was then noted by the Authority.

Item No. 3 : Shifting of Wholesale Iron and Steel Market to Kalamboli.

The Authority considered the Item Note and after discussion, passed the following Resolution :

RESOLUTION NO.316 :

"Resolved that having considered the progress made in developing Wholesale Iron and Steel Market at Kalamboli in New Bombay, in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 3 of the Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983 (Maharashtra Act No.XLII of 1983), the Bombay Metropolitan Region Development Authority hereby declares that with effect from 1st January, 1987, the following locality of the Bombay Metropolitan Region shall be declared as Market Area and the Market Yard as shown below :

'Market Area :

The whole of the Bombay Metropolitan Region as defined in clause (b) of Section 2 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Maharashtra Act No.IV of 1975).'

'Market Yard :

All that part or portion of the Revenue villages of Kalamboli, Roadpali, Ambetarakhar, Valavli and Tembhode (excluding Khidakpada and Sudhir Nagar) in District Raigad under Section 4 and other applicable provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Maharashtra XLI of 1966) and included in the site for New Bombay designated under sub-section (1) of Section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966), which part or portion is bounded as follows :

| | |
|---|---|
| East | ... Existing Diva-Panvel Railway line. |
| North | ... River Navade. |
| West | ... National Highway No.4. |
| South | ... Compound wall (north) of FCI.' |

"Resolved.....

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to publish the Notification in the official Gazette as required under the Act.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take effective steps under the Maharashtra Act XLII of 1983 - The Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983 for establishment of the Market Area, Market Yard and the Market Committee and to prohibit carrying wholesale trade activity in Iron and Steel in any place except at Kalamboli Market Yard- in the Bombay Metropolitan Region."

"It was suggested that visit of the Authority Members to Iron and Steel Market at Kalamboli be arranged."

<u>Item No. 4</u> : <u>Draft Interim Development Plan for Dombivali and surrounding areas - Appointment of Planning Committee under Section 28 of MR&TP Act to consider the suggestions/objections received.</u>

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.317</u> :

"Resolved that the Authority appoints a Planning Committee consisting of the following members :

1. Shri Pandurang S. Deshmukh;
2. Shri Chandrashekhar Prabhu; and
3. The Metropolitan Commissioner,

to consider the suggestions and objections under Section 28(2) of MR&TP Act, 1966, received in response to the publication of the said Draft Interim Development Plan for Dombivali and surrounding areas.

"Resolved further that any two of the above members will constitute a valid quorum.

"Resolved further that the Planning Committee should, after hearing the persons concerned, submit their recommendations along with the proposed modifications,

if any, to the said Interim Development Plan, to the Authority for consideration."

Item No. 5 : BUDP - Annual Report for the year 1985-86.

During the course of discussion on this Item, the following suggestions were made after which the Annual Report of Bombay Urban Development Project for the year 1985-86 was noted :

(1) Charging 8½% interest on the loan made available to agencies was considered to be on a higher side. It was suggested that a suitable representation for reducing this rate of interest be made to Government of India; and

(2) It was stated that Rs.3/- crores are provided in the project which could be spent for garbage collection system in hutments and also for community development. Bombay Municipal Corporation was requested to submit necessary proposals, if they wish to take advantage of the provision.

Item No. 6 : Annual accounts of the BMRDA for the year 1985-86.

During the course of discussion on this Item, the following points were made out :

(1) On enquiry from members, the Chief Engineer gave the details of expenditure of Rs.45 lakhs made during the year 1985-86. It was then suggested that a visit of the members of the Authority to the Mahim Nature Park be arranged; and

(2) It was observed that as per provisions of Section 18(1)(a) of the BMRDA Act, 1974, State Government should have given a total grant of atleast Rs.55 crores to the BMRDA since its inception, against which actual contribution of the State Government was only Rs.12.47 crores. Similarly, as against the State Government's expected contribution to the Revolving Fund of Rs.10 crores, only Rs.3.5 crores were made available. Members suggested that State Government be urged to atleast make available minimum statutory contribution laid down in the BMRDA Act.

The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.318 :

"Resolved that the Bombay Metropolitan Region Development Authority hereby accords its approval to

the.....

the accounts of the Authority for the year 1985-86 and the Report of the Financial Adviser thereon."

Item No. 7 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme for the year 1985-86.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.319 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1985-86 of the BMRDA as Special Planning Authority for Blocks III to VI under the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, and further resolved that the Metropolitan Commissioner be authorised to submit the same to the State Government."

Item No. 8 : Annual Report for the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1985-86.

During the course of discussion on this item, the following suggestions were made :

(1) On enquiry from members, the Chief Engineer gave the information about dredging of Mithi River. He stated that tenders for a part of the work costing about Rs.44 lakhs have been invited and these will be finalised very soon and work would be started.

(2) A suggestion was made that an aerial survey of the organic system of drains for the entire Suburbs be made. It was stated that a provision of Rs.10 lakhs has been made in the Budget Estimate of the DPDC for the year 1986-87. The suggestion was agreed to be examined.

(3) On enquiry from members, it was stated that on the basis of data collected from the concerned sources, design of sluice gate has been made. The design storm is for maximum intensity of rain at 2½" per hour continuously for 4 hours when there is rising tide.

(4) A suggestion was made to give priority for dredging Mithi River including Vakola Nalla and to examine whether additional funds could be provided.

The .....